

म. ग्रं. सं. ठाणे
विषय [illegible]
क्रा. क्र. [illegible]

IRBK-0116634

IRBK-0116634

नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें नागरिकशास्त्रावरील पुस्तकें

# बाल-नागरिक

## पुस्तक पहिलें

[ पहिल्या इयत्तेसाठीं ]


लेखक

प्रा. केशव गोपाळ पंडित, एम्. ए.

कीर्ति कॉलेज, मुंबई



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. १६६३४ नों दि. १०।८।५६
वि. ग्रा.वा.

IRBK-0116634

IRBK-0116634



केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई


मूल्य ३० पैसे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ घाणेरडा घारू | ... ... | ३ |
| २ मळके कपडे घालणारा बाळू | ... | ५ |
| ३ घाण करणारे सदू आणि गोंदू | ... | ८ |
| ४ केर करणारा किसन | ... | ११ |
| ५ दांडगाई करणारीं मुलें | ... | १४ |
| ६ पाणी खराब करणारीं मुलें | ... | १६ |
| ७ या मुलांना वळण नाहीं | ... | १९ |
| ८ तोंडांत वाईट शब्द कसे ? | ... | २२ |
| ९ असा गोंधळ नाहीं कामाचा | ... | २४ |
| १० मधें बोलूं नये | ... ... | २७ |
| ११ नीट रांगेंत चला | ... ... | ३० |



सर्वाधिकार सुरक्षित



प्रथमावृत्ति : १९४३

पुनर्मुद्रण : १९४३, १९४४

१९४६, १९४९, १९६४

मुद्रक : राजाराम ब. देशमुख, मुंबई वैभव प्रेस, गिरगांव, मुंबई ४.

प्रकाशक : श्री. बा. ढवळे, केशव भिकाजी ढवळे, गिरगांव, मुंबई ४.

वाचनालय
दा. क्र. १६६३४ ता. १०।८।७८
वि. बा. वा



## घाणेरडा घारू

ठण् ठण् ठण्! शाळेची घंटा झाली. मुलें भराभर वर्गांत जाऊं लागलीं. त्यांत घारूही होता. सगळीं मुलें आपापल्या जागेवर बसलीं. घारू एकटाच शेवटच्या बाकावर जाऊन बसला.

मास्तर आले. घारूकडे पाहून ते म्हणाले, ‘ घारू, तूं एकटाच कां मागें ?’

‘ मला जवळ बसूं देत नाहीं कोणी, मास्तर.’ घारू म्हणाला.

‘ तसें नाहीं मास्तर,’ मुलें एकदम ओरडलीं, ‘ तो घाणेरडा आहे.’

‘ त्यानें तोंड धुतलें नाहीं.’

‘ त्यानें आंघोळ केली नाहीं.’


‘ त्याच्या डोळ्यांना चिपडें आहेत.’

‘ त्याच्या नाकाला शेंबूड आहे.’

‘ त्याचा कान वाहातो आहे.’

‘ त्याच्या अंगाला खरूज आहे.’

‘ ऐकलेंस घारू, तुला कोणी जवळ कां बसूं देत



नाहीं तें ?' मास्तर म्हणाले. घारूनें खालीं मान घातली. 'उद्यांपासून असें घाणेरडें राहावयाचें नाहीं बरें घारू,' मास्तरांनीं सांगितलें.

'मुलांनो, स्वच्छ राहाण्यासाठीं घारूनें काय काय केलें पाहिजे ?' मास्तरांनीं विचारलें.

'रोज राखुंडीनें दांत घांसून तोंड धुतलें पाहिजे.'

'नाक शिंकरलें पाहिजे. डोळे साफ केले पाहिजेत.'

'साबण लावून आंघोळ केली पाहिजे.'

'कानांतला मळ काढला पाहिजे केव्हां तरी.'

'नखें काढलीं पाहिजेत. त्यांत मळ सांचतो.'

'मधून मधून रेचक घेतलें पाहिजे. म्हणजे पोट

साफ राहील. खरूज होणार नाहीं.'

'घारू या सगळ्या गोष्टी करील! होय ना घारू?' मास्तरांनीं विचारलें. घारूनें 'होय' म्हटलें.

'मग आम्ही त्याला जवळ घेऊं.' मुलें म्हणालीं.


'ऐकलेंस घारू?' मास्तर म्हणाले, 'घाणेरड्या मुलाला कोणी जवळ घेत नाहीं. त्याच्याजवळ कोणी जात नाहीं. कधींही घाणेरडें राहूं नये. दुसऱ्याला किळस येते. आपल्याला हुशारी वाटत नाहीं. आपण आजारी पडतों. 'शरीर स्वच्छ तर मन स्वच्छ' अशी म्हण आहे. म्हणून मुलांनो, तुम्ही नेहमीं स्वच्छ राहा!'

अभ्यास : (१) घारूला मुलें जवळ कां घेत नव्हतीं? (२) तोंड केव्हां धुतात? (३) दांत कशाकशानें घांसतात? (४) आंघोळ कशी करतात? (५) खरूज कोणाला होते? (६) नखें कां वाढवूं नयेत? (७) रेचक कशासाठीं घ्यावें लागतें?

---

## २ . . . मळके कपडे घालणारा बाळू

शाळा सुटली. मुलें घरीं आलीं. 'आई, आम्हांला खायला?' त्यांनीं विचारलें. 'हो. आहे तर,'



आई म्हणाली, ‘ चला बसा पाटावर.’ सगळीं कपडे काढून हातपाय धुवून येऊन बसलीं. आईनें लाडवाची वाटी एकेकापुढें ठेविली. मुलें खाऊं लागलीं. इतक्यांत बाळू तसाच येऊन बसूं लागला. तेव्हां आई म्हणाली, ‘ बाळू, तूं हातपाय धुतलेस ? ’

बाळू—नाहीं.

आई—आणि हे कपडे घालूनच तूं खायला बसणार का ? हा तुझा सदरा कसा आहे ?

बाळू—मळका.

आई—धुतला नाहीं ना पांच सहा दिवसांत ? आणि विजारीवर हे डाग कसले ?

बाळू—शाई सांडली शाळेंत लिहितांना.

आई—तुझे हातपाय कसे घाण झाले ?

बाळू—हुतुतू खेळतांना पडलों.

'झोंबाझोंबी करतांना. हो ना ?' आई म्हणाली. 'चल. अगोदर हातपाय धू. मळके कपडे काढ. मग बस खायला.'

बाळू ओशाळला. त्यानें लगेच कपडे काढले व हात पाय धुतले. 'खा आतां लाडू' आई म्हणाली. सगळीं मुलें चपापलीं. आईकडे व बाळूकडे पाहूं लागलीं. 'पाहातां काय ?' आई म्हणाली, 'आज बाळू सापडला. उद्यां तुम्ही कशावरून नाहीं तसेंच करणार ?'

निळू—आम्ही नाहीं मळके कपडे घालणार !

माळू—आम्ही नाहीं आमचे कपडे खराब करणार !

'बरें आहे. पाहीन मी !' आई म्हणाली, 'बाळूही चांगला धडा शिकला आज ! सगळीं ऐका. शरीर स्वच्छ पाहिजे, तसे कपडेही स्वच्छ हवेत. नाहीं तर काय उपयोग ? कपडे घरीं अगर परटाकडे धुतले गेले पाहिजेत. मधून मधून ते ब्रशानें साफ केले पाहिजेत. घामानें व धुळीनें ढेंकूण, उवा व पिसवा होतात.

घाणेरड्या कपड्यांत रोगाचे जंतु होतात. म्हणून घाणेरडे कपडे केव्हांही घालावयाचे नाहींत.'

अभ्यास : (१) आईनें बाळूला पाटावरून कां उठविलें ? (२) बाळू कां ओशाळला ? (३) मुलें कां चपापलीं ? (४) कपडे कशानें धुतात ? (५) कपडे घाणेरडे कशानें होतात ? (६) घाणेरडे कपडे घातले तर काय होतें ? (७) कपडे साफ कसे करतात ?

---

## ३ . . . घाण करणारे सदू आणि गोंदू

दहा मिनिटांची सुट्टी झाली. 'जा, सगळेजण लघवी करून पाणी पिऊन या,' मास्तर म्हणाले. सर्व मुलें शाळेच्या मागल्या बाजूकडे धावलीं.

कांहीं संडासाकडे गेलीं. कांहीं मुतारीपाशीं थांबलीं. बाकीच्यांनीं हौदाकडे धूम ठोकली. एकाचें झालें कीं दुसरा, दुसऱ्याचें झाल कीं तिसरा, असें चाललें होतें. थोड्याच वेळांत घंटा वाजली. मुलें आपल्या वर्गाकडे परत जाऊं लागलीं.

इतक्यांत जानू शिपाई दोन मुलांना घेऊन ऑफिसांत आला. त्याच्या मागें मुलांचा हा घोळका जमला. 'का रे जानू, यांना कां धरून आणलेंस ?'

हेडमास्तरांनीं विचारलें.


‘ साहेब, यानें मुतारी घाणेरडी केली व यानें संडास खराब केला. ’

‘ काय केलं या दोघांनीं ? ’

‘ या सदूनें मोरीच्या बाहेर लघवी केली व गोंदू संडासाच्या पायरीवर परसाकडे बसला. घाण सुटली बाहेर.’

हेडमास्तरांनीं त्या दोघांना जवळ बोलाविलें व ते त्यांना खूप रागें भरले. ‘साहेब, हे दोघे रोज सगळ्यांच्या पुढें धावतात. भारी मस्ती करतात, ’ जानू म्हणाला.

‘ पुन्हा तुमच्याविरुद्ध तक्रार आली तर पाहा



सदू; बरं का गोंदू ?' हेडमास्तर ओरडले.

सदू व गोंदू घाबरले आणि तेथून पाय काढूं लागले. जमलेल्या मुलांकडे बघून हेडमास्तर म्हणाले,

'पाहिलेंत मुलांनो, सदूला आणि गोंदूला कसें रागें भरून घ्यावें लागलें तें ? लक्षांत ठेवा. पायखाना व मोरी हीं नेहमीं स्वच्छ ठेवलीं पाहिजेत. त्यांत नीटपणें बसण्याची काळजी घेतली पाहिजे. मागाहून पाणी ओतलें पाहिजे, अगर सांखळी ओढली पाहिजे. नाहींतर मोऱ्या तुंबतील, बाहेर घाण सांचेल, आजूबाजूला घाण सुटेल, हवा दूषित होईल आणि शेवटीं रोगांचे जंतु पसरतील, तुम्ही आजारी पडाल.'

'एवढ्यासाठीं सगळ्यांनीं जपलें पाहिजे. कोठेंही घाण होऊं देतां कामा नये. कारण घाण हें रोगांचें घर आहे. ध्यानांत ठेवा.'

---

अभ्यास : (१) सदूला व गोंदूला हेडमास्तरांसमोर कां नेलें ? (२) हेडमास्तरांनीं त्यांना काय शिक्षा केली ? (३) सदू व गोंदू यांचे अपराध कोणते ? (४) पायखाना व मुतारी यांची स्वच्छता ठेवण्यासाठीं काय काय केलें पाहिजे ? (५) 'घाण हें रोगांचें घर आहे,' म्हणजे काय ?

किसननें आंघोळ करून कपडे घातले. त्याच्या बाबांनीं त्याला अभ्यास घेण्यासाठीं बोलाविलें. दप्तर घेऊन तो त्यांच्याकडे गेला. त्यानें दप्तर उघडलें तों त्यांतून वाळूचे खडे व काचांचे तुकडे बाहेर पडले.

'हें रे काय भरलें आहेस या पोतडींत ?'

'हा लहान मुलांचा संसार.' आई म्हणाली व हसली.

'अरे, ही पुस्तकांची पिशवी का केराची टोपली ?'

किसन ओशाळला व खालीं पाहूं लागला. दिवाणखान्याकडे व खोलीकडे बघत बाबा पुढें म्हणाले, 'आणि खोल्यांतून तरी किती रे कचरा करून ठेवला आहे ? सगळ्यांनीं जमून केर किती केला आहे, कागदाचे कपटे किती उडवले आहेत, कापडाच्या चिंध्या किती आहेत जागजागीं, बाहेरून कोणी आलें तर काय म्हणेल ? काय करीत होतात रे इथं ?'

'खेळत होतों,' किसन हलक्या आवाजांत म्हणाला.

'खेळतांना केर करावा लागतो होय ? मूर्ख कुठला ! थांब, आतां हा केरकचरा तुलाच भरायला लावतों.



म्हणजे तुला अद्दल घडेल. उचल तो कचरा आधीं.'
किसन मुकाट्यानें उठला व कचरा गोळा करूं लागला.

'तो कचरा कोठें टाकशील ?'

'केराच्या टोपलींत.'

'मग आण जा टेबलाखालची टोपली.'

किसननें टोपली आणली. कपट्यांनीं व चिंध्यांनीं टोपली भरली व कागद बाहेर सांडूं लागले.

'टोपली भरली. आतां काय करशील ? ती कोठें जाऊन रिकामी करशील ?'

'दाराबाहेर पेटी आहे त्यांत.'

'मग जा तर, टोपलींतला कचरा बाहेरच्या

डब्यांत टाकायचा. तो भरला असला तर महादूला तो रस्त्यावरच्या कचऱ्याच्या पेटींत ओतायला सांग. कचरा आंत पडला पाहिजे. बाहेर टाकतां अगर पडतां कामा नये. नाहींतर घाण दिसते.'

किसननें सांगितल्याप्रमाणें केलें. थोड्याच वेळांत सगळी जागा स्वच्छ दिसूं लागली.

'किसन,' बाबा म्हणाले, 'मघाशीं खोल्या कशा दिसत होत्या आणि आतां कशा दिसताहेत ? दिसला तुला फरक ? यापुढें घरांत कधीं केर करूं नको. खराब झालेले कागद टोपलींत टाकीत जा. आपलें शरीर किंवा कपडे जसे स्वच्छ पाहिजेत, तशीच बसण्याउठण्याची जागाही स्वच्छ पाहिजे. मग तो शाळेंतला आपला वर्ग असो, अथवा घरांतली आपली खोली असो.'

---

अभ्यास : (१) किसनच्या दप्तरांत बाबांना काय दिसलें ? (२) 'मुलांचा संसार' या म्हणण्याचा अर्थ सांगा. (३) केराची टोपली, डबा व कचऱ्याची पेटी यांतला फरक सांगा. (४) दिवाणखान्यांत मुलांनीं काय कचरा केला होता ? (५) बाबांनीं किसनला काय करायला लावलें ?

शाळेची मधली सुट्टी संपून वर्ग पुन्हा भरत होते. वर्गांतलीं मुलें घाईघाईनें वर्गांत येत होतीं. इतक्यांत पहिली ' ड ' मधून साने मास्तरांचा जोराचा आवाज ऐकूं आला. मुलें दारांतच थबकलीं. साने मास्तर चार पांच मुलांना दरडावीत असल्याचें त्यांना दिसलें. ' या, वर्गांत या आणि बघा या ' ढ ' मुलांचे उद्योग !' मास्तर म्हणाले. ' हीं बाकें कोणीं वेडींवाकडीं केलीं ? '

' आम्हीं. '

' सगळ्या वर्गभर ह्या केरकचरा कोणीं केला ? '


' आम्हीं. '

' आम्ही म्हणायला कांहीं लाज वाटत नाहीं तुम्हांला ? शाळेचा वर्ग म्हणजे उकिरडा आहे वाटतं ? पांढऱ्या स्वच्छ भिंतींवर निळ्या काळ्या रेघोट्या काय ओढून ठेवल्या आहेत ! सुंदर चित्रांची ओढाताण करून तीं फाडून काय टाकलीं आहेत ! बाकांवर शाई सांडून ते खराब काय केले आहेत ! वह्या आणि पुस्तकें फेंकून काय दिलीं आहेत. '

अपराध करणारीं मुलें घाबरलीं. त्यांचे हातपाय कांपूं लागले. इतर मुलें त्यांना हिणवूं लागलीं.

'हा खेळकरपणा नव्हे. याला खोडकरपणा म्हणतात ! हा खेळ नाहीं, ही दंगामस्ती ! तें कांहीं नाहीं. तुम्हांला शासन केलेंच पाहिजे. शासन दुसरें तिसरें कांहीं नाहीं. ज्यांनीं ही सगळी घाण केली त्यांनींच ती काढून टाकायची. चला हालवा हातपाय.'

हूं कीं चूं न करतां तीं मुलें वर्गाची साफसुफी करूं लागलीं. एकानें केर गोळा केला. दुसऱ्यानें बाकें नीट लावलीं. तिसऱ्यानें रेघोट्या पुसल्या. चौथ्यानें फेकलेलीं पुस्तकें रचलीं. अशा रीतीनें थोड्याच वेळांत



वर्ग पहिल्यासारखा स्वच्छ झाला.

'जा, बसा आतां आपल्या जागेवर ! आतां राहील ना आठवण ? कराल का कधीं केरकचरा वर्गांत ?'

मुलांनीं 'नाहीं' म्हणून माना खालीं घातल्या.

'मुलांनो, वर्ग नेहमीं कसा आरशासारखा स्वच्छ पाहिजे. त्यांत धूळ अगर घाण सांचली तर ती तुमच्या नाकातोंडांत जाईल. तुम्ही खोकूं लागाल, शिंकू लागाल. तुम्हांला त्रास होईल. वर्गांत स्वच्छता व टापटीप नसली तर लोक तुम्हांला हसतील. तुम्हांला व तुमच्या वर्गाला नांवें ठेवतील. तुम्हांला व मला कमीपणा येईल.'

अभ्यास : (१) 'मुलांचे उद्योग' कोणते ? (२) मास्तरांनीं त्यांना काय शासन केलें ? (३) वर्गांत स्वच्छता ठेवण्यासाठीं काय केलें पाहिजे ? (४) वर्गांत स्वच्छता नसली तर काय परिणाम होतात ? (५) 'टापटीप' म्हणजे काय ? (६) तुम्ही दांडगाई करतां का ?

---

## ६ . . . . . पाणी खराब करणारीं मुलें

आज रविवार ! शाळेला सुट्टी होती. दुपारीं मुलें अंगणांत खेळत होतीं. शेजारच्या घरचीं मुलेंही तेथें


जमलीं होतीं. वडील मंडळी जेवण आटोपून थोडा वेळ स्वस्थ पडली होती.

पुष्कळ वेळ उन्हांत खेळल्यामुळें मुलें दमलीं. त्यांना तहान लागली. कांहीं मागें विहिरीवर गेलीं. थोडीं हौदाकडे धांवलीं. बाकीच्चीं तिवईवर माठ होता. त्याच्याजवळ गोळा झालीं. त्यांच्या आरडाओरड्यानें आई उठली व बाहेर आली.

' डोक्यावर घेतलं आहे जसं कांहीं घर सगळ्यांनीं ! जरा तरी स्वस्थ पडूं द्याल कीं नाहीं आम्हांला ? '

' अग आई, आम्ही सगळीं पाणी पीत आहोंत. '

आईनें सगळीकडे नजर फिरवली व ती म्हणाली,



' ही काय पाणी पिण्याची रीत ? त्या माठांत घाणेरडे हात काय घालतां, उष्टीं भांडीं काय बुडवितां ? तो पाहा, तो मुलगा हौदाच्या तोटीलाच तोंड लावीत आहे. तें पाणी मग इतरांनीं कसें प्यावयाचें ? तीं दोघं बघा विहिरींत पाचोळा व खडे टाकीत आहेत, अशानें पाणी खराब नाहीं होत ? त्यांत घाण नाहीं सांचत ? चला, व्हा दूर सगळीं हौदापासून आणि विहिरीपासून ! '

आईचे शब्द ऐकतांच मुलें मागें फिरलीं. एक-मेकांत कुजबुजूं लागलीं. तें पाहून आई म्हणाली, ' वेडीं कुठलीं. म्हणे आम्ही शाळेंत जातों. कशाला ? या गोष्टीसुद्धा तुम्हांला कळत नाहींत. चला, या इकडे माजघरांत. मी देतें सगळ्यांना प्यायला पाणी. '

इतकें बोलून आई आंत गेली. थंड पाण्याचे दोन तांबे भरून तिनें माजघरांत आणले. एकेकाला एक एक भांडें भरून ती देऊं लागली.

' अहाहा ! काय गार पाणी आहे ! ' मुलें म्हणालीं.

' आहे ना ? मग प्या तर पोटभर. पण लक्षांत ठेवा, कीं पिण्याचें पाणी केव्हांही खराब करावयाचें

नाहीं. त्यांत कचरा टाकावयाचा नाहीं. तें उष्टें करावयाचं नाहीं. तोंडांतील घाण त्यांत जाते. तें उघडें टाकायचें नाहीं. वरून कोळिष्टकें, पाल वगैरे पडण्याची भीति. घाणेरड्या पाण्यांत रोगांचे जंतु होतात. नारू, ताप, कॉलरा असले रोग घाणेरड्या पाण्यापासून होतात. शुद्ध हवा तसेंच स्वच्छ पाणी ! इतर कशाची नाहीं, इतकी आपणांस याची जरुरी आहे.'


अभ्यास : (१) आई कशामुळें जागी झाली? (२) मुलें कशा रीतीनें पाणी पीत होतीं? (३) मुलांनीं पाण्याची काय खराबी केली? (४) पाणी घाण झालें, तर काय होतें? तुम्ही पाणी कसें पितां? (५) पाणी स्वच्छ ठेवण्यासाठीं काय काळजी घ्यायला पाहिजे?

---

## ७ . . . . . या मुलांना वळण नाहीं

शाळा सुटायला थोडा अवकाश होता. मास्तर मार्क मांडून मुलांना घरचा अभ्यास देत होते. तेवढ्यांत हेडमास्तर एकदम वर्गांत शिरले. कांहीं मुलांनीं उठून त्यांना नमस्कार केला; बाकीचीं तशींच बसून राहिलीं.

'हें पाहा, कुळकर्णी, उद्यां कांहीं बडी मंडळी



शाळा बघावयास येणार आहेत, तेव्हां त्या तयारीनें राहा. ठपका येतां कामा नये.'

'त्याबद्दल काळजी नको आपल्याला.'

'ठीक' म्हणून हेडमास्तर घाईनें दुसऱ्या वर्गाकडे गेले. ते गेलेले पाहातांच मास्तरांनीं जीं मुलें बसून राहिलीं होतीं त्या सर्वांना उभें केलें व ते म्हणाले,

'किती वेळां सांगितलं तुम्हांला! कोणी मोठं माणूस वर्गांत आलं कीं उभं राहावं! नमस्कार करावा. आज जी चूक केलीत तीच उद्यां कराल. उद्यां बडी मंडळी येणार आहेत शाळेंत. तीं म्हणतील, या मुलांना मुळींच वळण नाहीं. अगदींच अडाणी आहेत.'

दि. २१

' मास्तर, उद्यां नाहीं आम्ही चुकणार. आम्हांला वाटलं, बाहेरचे लोक आले म्हणजे तेवढं उभं राहायचं.'

' बाहेरचे आणि आंतले असं कांहीं नाहीं. मोठं माणूस आंत आलं, कीं अदबीनें उभं राहायचं. त्याना नमस्कार करायचा. विचारलेल्या प्रश्नांचीं नीट उत्तरं द्यायचीं. कोणाशीं बोलायचं नाहीं. हसायचं नाहीं. आवाज करायचा नाहीं. स्वस्थ बसायचं.'

' मास्तर, कोणी आंत येईल तेव्हां उभं राहायचं कीं बाहेर जाईल तेव्हांही ?'

' दोन्ही वेळेला. येतांना तसंच जातांना उभं राहायचं व नमस्कार करायचा. तुम्ही अशा रीतीनें वागलांत तर लोक तुम्हांला चांगलं म्हणतील. शाबासकी देतील. मग ? तुम्ही मुलं शहाणीं कीं वेडीं ?'

' शहाणीं,' सगळीं मुलें एका आवाजांत म्हणालीं.

' होय ना ? मग नेहमीं नीट वागा. शाळेंत अगर घरीं कोणी ओळखीचं माणूस भेटलं, तर त्याला नमस्कार करावा, दोन गोड शब्द बोलावे. नीट वागणं यालाच चांगलं वळण म्हणातात.'

अभ्यास : (१) हेडमास्तर एकदम वर्गांत कां शिरले? (२) हेडमास्तरांनीं मास्तरांना काय सांगितलें? (३) मास्तरांनीं कांहीं मुलांना उभें कां केलें? (४) मोठ्या मंडळीसमोर मुलांनीं कसें वागावें? (५) 'चांगलें वळण' म्हणजे काय? (६) तुम्ही कसे वागतां?

---

## ८ . . . . तोंडांत वाईट शब्द कसे?

आज गुढीपाडवा! शाळेला सुट्टी होती. दुपारीं शिरापुरीचें जेवण होतें. जेवण झाल्यावर मुलांनीं विटीदांडूचा खेळ सुरू केला. एका बाजूला हीं मुलें. दुसऱ्या बाजूला शेजारच्या गोडबोल्यांचीं मुलें. खेळ ऐन रंगांत आला असतां एक झेल उडाला. तो धरला कीं सुटला यावर भांडण सुरू झालें. मुलें एकमेकांना वाटेल तशीं बोलूं लागलीं. 'तुम्ही रडे!'

'तुम्ही खोटारडे!'

'तुम्ही मूर्ख आहांत!'

'तुम्ही शतमूर्ख आहांत!'

'तुम्ही गाढव आहांत!!'

'गुढीचा पाडवा, नीट बोल गाढवा!' एकजण

ओरडला व मोठ्यानें हसला. मुलें अधिकच चिडलीं. इतक्यांत आंतून आई बाहेर आली व ओरडली,

‘ गप्प राहा पाहूं एकदम. शाळेंत जातां आणि शिव्या द्यायला शिकतां होय ? तुम्ही चांगल्या घरचीं मुलं. तुमच्या तोंडांत असले वाईट शब्द येतात कसे ? तुम्ही शहाणीं मुलं आणि असं वेड्यासारखं काय करतां ? ’

‘ आई, हे खोटं खेळायला लागले. ’

‘ काकू, हे वाईट शब्द बोलायला लागले. ’

‘ खऱ्याखोट्याचा निकाल मागाहून, ’ आई म्हणाली, ‘ अगोदर वाईट शब्द बोलल्याबद्दल तुम्ही या मुलांची क्षमा मागा पाहूं. ’



मुलांनीं तसें केलें. त्या मुलांनाही वाईट वाटलें. तीं ओशाळलीं. आईनें सगळ्यांच्या पाठीवरून हात फिरवला व ती म्हणाली,

'तुमचं नांव गोडबोले. किती चांगल नांव आहे. नेहमीं गोडच बोलत जावं. कधींही कडूं बोलूं नये. देवानें तोंड दिलं आहे तें चांगलं बोलण्याकरतां. वाईट बोलण्याकरतां नाहीं. गोड शब्दांनीं समजूत पटते. भांडण मिटतं. वेडंवाकडं बोलल्यानें तें अधिक वाढतं. म्हणून कधीं भांडण करूं नये व कधींही वाईट बोलूं नये.'

अभ्यास :(१) मुलांचें भांडण कशावरून झालें? (२) मुलें एकमेकांना काय बोललीं? (३) आईनें भांडण कसें मिटविलें? (४) वाईट शब्द बोलणें कां चांगलें नाहीं? (५) भांडण करण्यांत काय तोटे आहेत?

## ९ . . . असा गोंधळ नाहीं कामाचा !


शाळा भरली होती. वर्गांत भूगोलाचा तास होता. मास्तर ऋतूंविषयीं माहिती सांगत होते. मुलें मधून

शंका विचारीत होतीं. धडा संपल्यावर मास्तरांनीं प्रश्न विचारला. ‘ उन्हाळ्याला उन्हाळा कां म्हणतात ?’

‘कारण त्या दिवसांत कडक ऊन असतें म्हणून,’ सगळीं मुलें एकदम ओरडलीं.

‘ असं नाहीं. एकदम सगळ्यांनीं नाहीं बोलायचं. अशानें गोंधळ होतो. ही शाळा आहे. बाजार नाहीं. हें पाहा. मी प्रश्न विचारीन. ज्यांना येत असेल त्यांनीं हात वर करावा. मी बोट दाखवीन त्यानें उत्तर द्यावं, तेंही उभं राहून; बसून नाहीं.’ मुलें बसलीं. मास्तरांनीं पुन्हा प्रश्न विचारला.

‘ पावसाळ्याला पावसाळा कां म्हणतात ?’ बहुतेक



मुलांनीं हात वर केले व तीं ‘ मी, मी ’ करूं लागलीं.

‘ थांबा. एकेकाची पाळी. एक झाल्यावर दुसरा. तूं सांग बंडू ?’

‘ त्या दिवसांत खूप पाऊस पडतो म्हणून. ’

‘ बरोबर आहे. आतां तूं सांग पुंडू, हिवाळ्याला हिवाळा कां म्हणतात ?’

थोडा वेळ डोकें खाजवून पुंडूनें उत्तर दिलें,

‘ त्या दिवसांत थंडी असते म्हणून. ’

‘ इतका विचार रे कसला ?’

‘ मास्तर, उन्हाळा, पावसाळा, तसा थंडाळा कां नाहीं म्हणत, अशी मला शंका आली. ’

सगळीं मुलें खो खो हसलीं.

‘ शंखा, ही का तुझी शंका ? पुंड आहेस. म्हणे थंडाळा ! खंडाळा नाहीं का ? खट्याळ कुठला ! बस खालीं. हिम म्हणजे बर्फ ज्या दिवसांत पडतें तो हिवाळा. समजलं का सगळ्यांना ? बसा सगळे खालीं. ’

‘ लक्षांत ठेवा, प्रश्नांचीं उत्तरं कशीं द्यायचीं तें. एकेकानें उठून नीट उत्तर द्यायचं. गोंधळ करायचा

नाहीं. वेडंवाकडं उत्तर द्यायचं नाहीं. शंका म्हणून कांहीं तरी नाहीं विचारायचं. नाहींतर लोक म्हणतील, हा मुलगा चावट आहे. नीट बोलणं व नीट वागणं यालाच शिस्त म्हणतात. हाच सभ्यपणा.'

अभ्यास : (१) 'ही शाळा आहे, बाजार नाहीं' असें मास्तर कां म्हणाले? (२) पुंडूला मास्तर कां रागें भरले? (३) पुंडूची शंका कोणती? (४) मास्तरांनीं त्याचें काय उत्तर दिलें? (५) प्रश्नांचीं उत्तरें कशीं द्यावयाचीं? (६) शंका कशा विचारावयाच्या?

---

## १० . . . . . . मधें बोलूं नये

आज मुंबईचे पाहुणे घरीं आले होते. त्यांनीं येतांना पुष्कळ खाऊ आणि खेळ आणला होता. मुलें त्यांच्यावर खूष होतीं. संध्याकाळीं सगळी मंडळी गप्पा मारीत बसली होती. मुलेंही तेथें आलीं. त्यांना पाहून पाहुणे म्हणाले, 'हें पाहा, आम्हीं तुम्हांला सकाळीं खाऊ दिला, खेळ दिला. पण तुम्हीं आम्हांला अजून तुमचं नांव नाहीं सांगितलं, गोष्ट नाहीं सांगितली, गाणं नाहीं म्हणून दाखवलं.'



‘ वेडीं मुलं कुठलीं !’ बाबा म्हणाले, ‘ बसा पाहूं खालीं सगळीं आणि करा सुरुवात.’

‘ बाळ, तुझं नांव काय ? ’ पाहुण्यांनीं विचारलें.

‘ माझं नांव माधव, ’ माधव मधेंच बोलला.

बाबा—तुला विचारलं पाहुण्यांनीं ? मधें बोलण्याची भारी सवय. मूर्ख नाहीं तर.

पाहुणे—जाऊं द्या बाबासाहेब, लहान मुलं तीं. त्यांना काय कळतं आहे ?

बाबा—न कळायला काय झालं ? किती वेळां सांगितलं. फार वाईट सवय आहे त्याला.

मुलांनीं सगळ्यांनीं आपापलीं नांवें सांगितलीं.

'माळू, तूं आतां आम्हांला छानशी गोष्ट सांग पाहूं!' पाहुणे म्हणाले. माळू मनी मांजरीची गोष्ट सांगूं लागली. माधव मधेंच ओरडला,

'मला माकडाची गोष्ट येतें. मी सांगतों.'

'पुन्हा माकडासारखं मधें तोंड घातलंस. मघाशीं सांगितलं तुला. इतक्यांत विसरलास?' बाबा रागावले.

माधव गप्प बसला. 'माधव, असं मधें बोलूं नये. वाईट दिसतं. आपल्याला विचारतील तेव्हां आपण बोलावं.' पाहुण्यांनीं त्याची समजूत केली.

गोष्टी सांगून झाल्यावर पाहुणे म्हणाले, 'मोहन, तूं गाणं म्हण पाहूं सुंदरसं.' मोहननें 'गड्या, पावसा' म्हणण्यास सुरुवात केली. माधवला पुन्हा गप्प बसवेना. तो म्हणाला. 'मला वेड्याचं गाणं येतं. मी म्हणूं का?'

आतां मात्र बाबा चिडले. 'तूंच वेडा आहेस. मुळींच म्हणूं नकोस गाणं. जा येथून उठून. तुला मुळींच अक्कल नाहीं,' बाबा म्हणाले.

आतां मात्र माधव हिरमुसला. पाहुण्यांनीं त्याला जवळ घेतलं व ते म्हणाले, 'माधव, तूं शेवटीं गाणं

म्हण. मग झालं ? आणि यापुढें असं मधें बोलण्याचं सोडून दे. मधें बोलणं गैर दिसतं. लोकांना आवडत नाहीं. तुझ्याप्रमाणें इतरांनाही बोलावंसं वाटतं. त्यांचा हिरमोड होऊं नये, म्हणून आपली पाळी येईपर्यंत आपण शांत राहावं. असं करील तोच शहाणा मुलगा !'

अभ्यास : (१) पाहुण्यांनीं मुलांना काय काय दिलें ? (२) पाहुण्यांनीं मुलांना काय काय विचारलें ? (३) बावा माधवला कां रागावले ? (४) माधवनें किती वेळां चूक केली ? कोणती ती चूक ? (५) 'मधें बोलणें' हें वाईट कां ? (६) तुम्हांला मधें बोलण्याची सवय आहे का ?.

## ११ . . . . . नीट रांगेंत चला

शाळा सुटण्याची घंटा झाली. घरीं जाण्यासाठीं मुलांची धांदल उडाली. मास्तर उठण्याचीच मुलें वाट पाहात होतीं. ते उठले मात्र, तों सगळीं दाराकडे धावलीं. मास्तरांनीं सगळ्यांना मागें फिरविलें व ते म्हणाले,

'तुम्ही मुलं आहांत का गुरं आहांत, वाटेल तशीं चाललांत तीं ? असं वाकडं तिकडं जायचं वर्गांतून ? अडाणी कुठलीं ! जा, पुन्हा जागेवर जाऊन बसा.'

मुलांना फारच वाईट वाटलें. परंतु करतात काय? निमूटपणें तीं परत जागेवर जाऊन बसलीं. परंतु सर्वांचें लक्ष घरीं लागलेलें. त्यांना सुचेनासें झालें. कांहीं कांहीं मुलें तर रडूं देखील लागलीं. शेवटीं मास्तरांना त्यांची दया आली व ते म्हणाले,

'उठा आणि आपापल्या जागेवर उभे राहा. नंतर एका मागें एक असे नंबराप्रमाणें चला. धावावयाचें नाहीं. एकमेकांतलें अंतर सारखें ठेवायचें. पावलेंही एकसारखीं पडलीं पाहिजेत. कोणी चूक केली तर त्याला मागें राहावें लागेल. लक्षांत ठेवा. हं, चला, नीट रांगेत चला.'

मुलें नंबराप्रमाणें उभीं राहिलीं व रांगेत चालूं



लागलीं. सगळीं मुलें जाईपर्यंत मास्तर तेथच उभे राहिले. मुलें रांगेंत जात असतांना किती सुंदर दिसत होतीं. तें पाहून मास्तर मुलांना म्हणाले,

‘ बघा, रांगेनें जातांना तुम्ही किती सुंदर दिसतां ! तेंच एक इकडे, एक तिकडे, एक मागें, एक पुढ, असे चाललांत तर तें किती वाईट दिसतं ? ’

‘ घरीं काय अथवा शाळेंत काय, बसतांना ओळींत बसावं, चालतांना रांगेंत चालावं. सगळ्यांनीं एकदम गर्दी केली, कीं गोंधळ उडतो व सर्वांनाच त्रास होतो. नंबराप्रमाणें व रांगेनें मुलं बसलीं म्हणजे सोयही होते. कोणी विसरून राहात नाहीं. कोणी दोनदां मोजला जात नाहीं. नांव आठवलं नाहीं तरी चालेल. नंबरावर काम होतं. तेव्हां रांगेनें चालण्यांत अगर बसण्यांत शोभा आहे, तशीच सोय आहे. शिवाय ती एक शिस्तही आहे.

अभ्यास : (१) मास्तरांनीं मुलांना मागें कां फिरविलें ? (२) मुलें रडूं कां लागलीं ? (३) मास्तरांनीं मुलांना कशा रीतीनें जावयास सांगितलें ? (४) रांगेंत चालण्याचे अगर बसण्याचे काय काय फायदे आहेत ?

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. १६६३४ नों दि १०/.../...

IRBK-0116634
IRBK-0116634